①

आरोग्य सेवा

जि.प्र.कें.
जा.क्र.एनएचएम/डायट दरपत्रके/११०/२०२६
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर
दिनांक२५/०६/२०२६.

वाचले:- जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत चहा, अल्पोहार, व भोजन खरेदी करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यता दि.२२/०६/२०२६

## जाहिर नोटीस

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा एकात्कि आरोग्य सोसायटी अंतर्गत जिल्हा स्तरावर इतर आरोग्य सोसायटी (आय.डी.एस.पी., एन.एच.एम., टी.बी. लेप्रसी, मलेरिया, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशि.केंद्र इ.) कार्यालयामध्ये प्रशिक्षण सत्रे तसेच सभा कार्यशाळांकरीता जेवण, चहा, नाष्टा सेवा पुरवठार नेमणेचा आहे. तरी सन २०२६-२७ या एक वर्षाकरीता या नोटीसीद्वारे विहीत नमुन्यात ई-कोटेशन मागविणेत येत आहे. हे नोटीस मिळालेपासून आपलेकडुन दोन लखोटा पध्दतीने शिलबंद लखोटयात खालील पत्यावर कार्यालयीन वेळेत समक्ष किंवा पोस्टाने सात दिवसांच्या आत दिनांक०६/०७/२०२६ रोजी साय. ०५.०० पुर्वी मिळतील असे पाठवावे. मुदतीनंतर आलेले दरपत्रकं स्वीकारली जाणार नाहीत.

पुरवठादाराचे नाव व पत्ता :-.......................................................
(फर्मचे नांव, प्रोप्रायटर व पत्ता.......................................................
.......................................................

दरपत्रक धारकांनी तांत्रीक लखोटा क्र.१ मध्ये खालील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जोडणेत आवश्यक आहे. तसेच लखोटा क्रमांक २ मध्ये सोबत जोडलेला दरांचा विहीत नमुन्यामध्ये दर भरणेचे आहेत.लखोटा क्रमांक १ वर जेवण चहा नाष्टा करीता तांत्रीक कागदपत्रे असा उल्ले करावा. तसेच लखोटा क्र.२ मध्ये जेवण चहा नाष्टा दराचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करणेत यावा.

१) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स.
२) पॅन कार्ड झेरॉक्स.
३) प्रपत्र अ.
४) जीएसटी सर्टीफिकेट/जीएसटी लागू नसलेस सी.ए.चे प्रमाणपत्र.
५) मागील तीन वर्षात (२०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) उलाढाल रक्कम रु.१५ लक्ष पेक्षा जास्त असलेचे सी.ए.चे प्रमाणपत्र
६) अन्न व औषध प्रशासनाचा दाखला
७) आयकर विविरणपत्र दाखल केलेबद्दल ITR -V( मागील दौन आर्थिक वर्षाची २०२३-२४, २०२४-२५)
८) काळया यादीत नाव नसलेबाबत स्वयंघोषित दाखला
९) दरांचा विहीत नमुना अटी व शर्तीमान्य असलेबाबत निवीदाधारकाची सही व शिक्का सहीत.
१०) शासकीय संस्थेमध्ये जेवण चहा नाष्टा पुरविलेबाबतची किमान २ अनुभव प्रमाणपत्रे

**अटी व शर्ती :-**

१) सशर्त दरपत्रक विचारात घेतल्या जाणार नाहीत.
२) ज्या दरपत्रकामध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दरामध्ये संदिग्धता असेल अशी दरपत्रके नाकारली जाण्यास पात्र ठरेल.
३) दरपत्रकामधील दर हे सर्व करांसहीत (जीएसटी सहीत) देणेत यावेत.
४) पुरवठा आदेश मिळाले पासून दिलेल्या मुदतीत साहित्य स्वखर्चाने कार्यालय सांगेल तसे व तिथे स्वखर्चाने, वाहतुक खर्च व इतर सर्व करासह पोहोच करणेचे आहे.
५) अंदाजित दर्शविलेल्या साहित्याची खरेदी कमी किंवा जास्त होण्याची शक्यता आहे.

६) सुरक्षा ठेव रक्कम :- ज्या दरपत्रकधारकाचे दर स्वीकृत केली जाईल त्या दरपत्रक धारकाने खरेदी अंदाजित रक्कम रु.१० लक्ष वर ३ टक्के एवढी सुरक्षा ठेव रक्कम ३०,०००/- बॅक गॅरंटी पत्र देणेत यावे.

७) अनामत रक्कमेचा भरणा व करारनामा कळविलेल्या दिवशी परंतु कोणत्याही परिस्थित पंधरा दिवसांच्या आत भरणे बंधनकारक राहिल. मुदतीत अनामत रकमेचा भरणा केला नाही व करारनामा करुन दिला नाही तर त्याची दरपत्रक रदद् समजणेत यईल व त्याचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेत येईल.

८) चहा, नाष्टा व जेवण यांचेकरिंता नमुद केलेल्या दरांची सरासरी काढून कमी सरासरी असणा-या दरपत्रकाची निवड करणेत येईल. दर समान आलेस महिला बचत गट /नोंदणीकृत महिला मंडळ यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच शासन निर्णय क्र.माविम-२००१प्र.क्र.१६७/का-१० दि.३ ऑक्टोबर २००१ नुसार अंमलबजावणी करणेकामी कार्यालयाकडील विविध नॉर्म अधिन राहुन निर्णय घेणेचे अधिकार जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.कोल्हापूर यांचेकडे राखुन ठेवणेत आलेले आहेत.

९) प्रशिक्षण नार्म मधील रक्कम रुपये १५०/- मधुन दोन वेळचे जेवण, एक वेळेला नाष्टा व २ वेळा चहा (निवासी प्रशिक्षणाकरीता) पुरविणे आवश्यक राहिल तसेच प्रशिक्षण नॉम रक्कम रु.१००/- मधुन एकवेळेला जेवण, एक वेळेला नाष्टा व दोन वेळ चहा (अनिवासी प्रशिक्षणाकरीता) तसेच प्रशिक्षण नॉर्म रक्कम रु.१२५, १६०, २००, २५० इ. मंजुर असलेस प्राप्त दरामधुन ऑर्डर दिली जाईल.

१०) सदर बाबीकरता सन २०२६-२७ मध्ये शासनाकडून मंजूरी व अनुदान उपलब्ध झाले तरच कंत्राटी आहार सेवा सुरु ठेवली जाईल.

११) कोणत्याही परीस्थितीत अग्रिम संस्थेकडून दिला जाणार नाही.

१२) दरपत्रकातील दर हे फक्त एजन्सी नॉमिनेट करणेकरीता निश्चित केले जातील. शासनाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शक सुचनेनुसार दिलेले दर याला अधीन राहून देय्यके अदा करणेत येतील.

१३) दरपत्रक कालावधीमध्ये कोणतेही कर लागू झाले/वाढून आलेस मंजूर निविदेतील दर वाढून मिळणार नाहीत. सदर सर्व कर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

१४) प्रशिक्षणार्थींची संख्या सर्वसाधारण १५ ते ४० असेल तसेच वर्कशॉप वेळी ती संख्या जास्तीत जास्त होवू शकते.

१५) प्रशिक्षण कालावधी कमीत कमी एक/दोन/तीन/पाच/आठ/पंधरा/एकवीस दिवसांचा असेल.

१६) दरपत्रक धारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर सही व शिक्का असणे आवश्यक आहे. त्याशिवाय विचार केला जाणार नाही.

१७) प्रशिक्षणार्थींना चहा/नाष्टा व जेवणाचा दर्जा उत्तम प्रकारचा रहाणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थींकडून आपणांबाबत काही तक्रार झालेस आपली मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी आपणांस पूर्व सूचना न देता रदद् करणेत येईल.

१८) प्रशिक्षणार्थींची प्रक्षेत्र भेट व वर्कशॉप ज्याठिकाणी असेल तेंव्हा त्या प्रक्षेत्राच्या/वर्कशॉपच्या ठिकाणी चहा,नाष्टा व जेवण सुविधा स्वखर्चाने उत्तम प्रतीचे पुरविणे बंधनकारक राहील.

१९) प्रशिक्षणार्थींना भोजन वाढण्यासाठी निविदाकाराने नेमलेला कर्मचारी वर्ग स्वच्छ, निरोगी, टापटीप तसेच निर्व्यसनी असावा.

२०) दरपत्रकधारकाने नेमलेले कर्मचारी कोणत्याही गुन्हयांशी अथवा कायदेभंग विषयक प्रकरणाशी संबंधीत नसतील याची दक्षता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

२१) अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्याचे पालन करण्याची तसेच त्या अंतर्गत कोणत्याही कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहिल.

२२) अन्नविषबाधा होऊन शारिरीक /जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेचा ठेकेदारांची राहील.

२३) अपरीहार्य कारणास्तव भोजन सुविधा पुरविणे ठेकेदारास शक्य नसल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे त्यानंतर करार संपुष्टात येईल.

२४) धरपत्रकधारकाने भोजन पुरवठा दर्जेदार करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी उत्तम दर्जाचे किराणा माल, वस्तु, मसाले, भाजीपाला व कच्चा माल वापरला पाहिजे. जिल्हा आरोग्य अधिकारी/वै.अ. जिल्हा प्रशिक्षण केंद्र यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास/ कर्मचाऱ्यास केव्हाही स्वयंपाकगृह तसेच पुरविण्यात येणारे साहित्य कोणत्या प्रकारचे आहेत हे तपासण्याचे अधिकार राहतील

गरज भासल्यास साहित्याची (किराणा माल, वस्तु, तेल, मसाले इ.) शासकिय/खाजगी प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेतली जाईल. प्रयोगशाळेचे तपासणी शुल्क ठेकेदारास अदा करावे लागेल. तपासणीमध्ये साहित्याचा दर्जा योग्य नसल्याचे आढळून आल्यास दरपत्रकधारकाचा ठेका रद्द करण्यात येईल.

२५) सकाळचा नाष्टा, दोन वेळेचा चहा, व दुपारचे/रात्रीचे जेवण प्रशिक्षणाच्या ठिकाणी वेळेवर स्वखर्चाने उत्तम प्रतीचे पुरविणे आवश्यक आहे.

२६) प्रशिक्षणार्थी यांचे प्रत्यक्ष उपस्थित संख्येनुसार चहा, नाष्टा व जेवणाची रक्कम निविदेमधील मंजूर दराप्रमाणे दरमहा स्पर्श व पीएफएमएस प्रणालीव्दारे अदा करणेत येईल. तसेच प्रत्येक बिलातून टी.डी.एस.ची. रक्कम कपात करणेत येईल.

२७) संबंधित आहार पुरवठादारास व त्यांच्या कामगारांना कंत्राटी स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच शासन सेवेत कोणतेही हक्क राहणार नाहीत याबाबत ठेकेदाराने संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना पूर्वकल्पना दयावी. याबाबत काही वाद निर्माण होणार नाहीत याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

२८) कामावर असताना कोणतेही दुर्घटना झाल्यास व कंत्राटी कर्मचाऱ्यास दुखापत/मुत्यू सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी (आवश्यकता भासल्यास) कंत्राटदाराची राहील. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी, अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या अनुषंगाने नियमानुसार योग्य त्या इन्शुरन्स करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत हे कार्यालय/आरोग्य विभाग कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

२९) मंजुर दरपत्रकाची मुदत ही दरपत्रक मंजुर झालेल्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीकरीता पर्यंत राहील. सदर कालावधी संपल्यानंतर नवीन दरपत्रक अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्तीनुसार दोघांच्या संमतीने तीन महिन्याच्या कालावधीसाठी किंवा पुढील नवीन दरपत्रक अस्तित्वात येईपर्यंत चालू राहील.

३०) मंजुर दरपत्रकधारकाने शर्ती व अटींचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. दरपत्रक मंजुर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निर्देशनास येताच पूर्वसुचनेशिवाय कंत्राट रद्द करण्यात येईल आणि मंजुर दरपत्रधारकाचे नाव काळया यादीत घालून हमी रक्कम (सिक्युरिटी डिपॉझीट) जप्त करण्याबाबतची कडक कारवाई करण्यात येईल.

३१) आहार सेवेचे वळापत्रक खालीलप्रमाणे राहील

अ)चहा - नाष्टा :- सकाळी ८.०० ते १०.००

ब) दुपारचे जेवण :- दुपारी ०१.०० ते २.३०

क) दुपारचा चहा :- दुपारी ४.०० ते ५.००

ड) रात्रीचे जेवण :- रात्री ७.३० ते ९.३०

३२) संस्थेमध्ये चव रजिस्टर ठेवले जाईल. संस्थेचे अधिकारी/कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी भोजनातील समाविष्ठ अन्नपदार्थांची चव घेऊन तसा शेरा रजिस्टरमध्ये नोंदवतील. चहा, नाष्टा व भोजनाच्या चव, दर्जाबद्दल नकारात्मक शेरे असतील तर निविदाकारास लेखी समज दिली जाईल. त्यानंतरही वारंवार नकारात्मक शेरे असतील तर दरपत्रकधारकाचा ठेका रद्द करण्यात येईल.

३३) आहार पुरवठादाराने प्रशिक्षण केंद्रातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची भरपाई संबंधित ठेकेदारास देय होणाऱ्या रक्कमेतून वसूल केली जाईल.

३४) दरपत्रकधारकाने सदर कामासाठी उपठेकेदार नेमू नयेत. उपठेकेदार नेमलेचे निदर्शनास आलेय ठेका रद्द करणेत येईल.

३५) दरपत्रक हे अर्ज कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच दरपत्रके उघडयाचे तारखेत व वेळेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशिक्षण केंद्र प्रमुखांनी राखून ठेवलेले आहेत.

३६) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये करारनामा रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर(स्वखर्चाने) वेगळा करावा लागेल.

३७) सदर दरपत्रक प्रक्रियेबाबतच्या न्यायप्रविष्ठ बाबी कोल्हापूर शहर न्याय परिक्षेत्रात मर्यादीत राहतील.

३८) बिल आदायगी :- देयके एसएनए स्पर्श तसेच पीएफएमएस ने आदा केली जातात याकरीता राज्यस्तरावरुन आदा होणेसाठी पाठविले जाते. त्यामुळे विलंब लागू शकतो. याकरीता वारंवार कार्यालयात तक्रार करता येणार नाही.

३९) ताजा पोष्टीक आहार वेळेवर पुरवठा करावयाचा आहे. त्यामुळे फक्त स्थानिक पुरवठादार यांनी दरपत्रक भरणेचे आहे.

४०) बंधपत्र

मी/आम्ही गांभीर्यपूर्वक नमूद करीतो की मी/आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पुरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या सोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे/आहोत.

जर माझी/आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर दरपत्रकामधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधिल राहू. या अटी व शर्तीचा भंग मी/आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीला नुसार मी/आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी/आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीला नुसार अट क्र. १ ते ४० करीता बाधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक :

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नांव ..........................

पत्ता .........................

(डॉ.अनिरुध्द एन. पिंपळे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

नावे - जिल्हा आरोग्य अधिकारी,
राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष,
आरोग्य विभाग, जि.प.कोल्हापूर

दर भरावयाचा विहित नमुना

| अ.नं. | तपशिल | नग | Estimated cost | दर (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|
| १ | स्पेशल चहा | १ | ३० | |
| २ | उपमा - १ प्लेट | १ | ३० | |
| ३ | शिरा - १ प्लेट | १ | ३० | |
| ४ | पोहे- १ प्लेट | १ | ३० | |
| ५ | इडली चटणी सांबार - दोन इडली-१वाटी चटणी/सांबार | १ | ५० | |
| ६ | मिसळ - १ प्लेट - दोन पाव | १ | ७० | |
| ७ | समोसा -१ नग, १ प्लेट चटणी/सॉस | १ | २५ | |
| ८ | उडीदवडा सांबार - २ नग, १ वाटी सांबार | १ | ६० | |
| ९ | खिचडी ऋ दोन केळी (उपवासा करीता) १ प्लेट | १ | ७० | |
| १० | सॅडवीच | १ | ७० | |
| ११ | उच्च प्रतिचा मोठा कप आईस्क्रिम | १ | २० | |
| १२ | दही वाटी - १ वाटी (मध्यम आकाराची) | १ | १० | |
| १३ | जेवणः-शाकाहरी मर्यादित (प्रति ताट दर) चपाती/भाकरी,भात,वरण,आमटी, दोन भाज्या, कोशिंबिर, लोणचे, पापड,इ. | १ | १०० | |
| १४ | जेवणः- शाकाहारीः- अमर्यादित (प्रति ताट दर) चपाटी/भाकरी, मसाले भात, वरण, आमटी, दोन भाज्या,कोशिंबीर,लोणचे, पापड, कडी, मठ्ठा, फुरट सॅलेड. इ | १ | १६० | |
| १५ | नॉनव्हेज अमर्यादित अंडाकरी ताट :- चपाती/भाकरी/रोटी, अंडाकरी, मसाला राईस, कांदा, लिंबु. | १ | १५० | |
| १६ | स्पेशल शाकाहारी जेवणः- अमर्यादित (प्रति ताट दर) चपाटी/भाकरी/पुरी, मसाले भात, वरण, आमटी, पनिर भाजी उसळ, कोशिंबीर, लोणचे, पापड, कडी, मठ्ठा, फुरट सॅलेड. इ | १ | २५० | |
| १७ | डिनर :- दोन चपाती/भाकरी, राईस, भाजी, आमटी, लोणचे. | १ | ९० | |
| १८ | पाणी कॅन (२० लिटर) | १ | ८५ | |
| १९ | पाणी बॉटल (अर्धा लिटर/लहान साईज) | १ | १० | |
| | एकुण | | | |
| | सरासरी दर (एकुण बेरीज भागीले १९) | | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

(डॉ.अनिरुध्द एन. पिंपळे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

## दरपत्रक धारकांनी तांत्रिक कागदपत्रांमध्ये दयावयाच्या हमीपत्राचा नमुना

### <u>प्रपत्र - अ</u>

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिका-यांबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध/संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही. सदर जाहिर सुचनेमधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत.

दरपत्रकधारकाची सही व संस्थेचा शिक्का